The Berar General Education Society's

# Shri Radhakisan Laxminarayan Toshniwal College of Science, Akola (M.S.)

# (Shri R.L.T. College of Science)

Recognized by Government of Maharashtra
Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati






**5th Cycle of NAAC**
**ASSESSMENT AND ACCREDITATION**

## CRITERION V
## Students Support and Progression

### Key Indicator – 5.2
### Student Progression

### 5.2.1

**Number of placement of outgoing students during the year**

5.2.1.1: Number of outgoing students placed during the year

| Year | Name of student placed and contact details | Program graduated from | Name of the employer with contact details | Pay package at appointment |
|---|---|---|---|---|
| **2023-24** | Kalayani Suresh Javare | Shri RLT College of Science, Akola | Punye Shlok Ahilyabai Prahmaik Shala | 16000 per month |

वाचा :

१. शालेय शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. पीआरई - २००२/३३९५/प्राशि-१/दि.२७/०२/२००३

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. पीआरई-२००६/(४७६७)/प्राशि-१ दि.१६/१२/०९

३.शासन निर्णय क्र. बीसीसी २०१२/प्र.क्र.१०६५/२०११/16 ब.दि.१२ डिसेंबर २०११

४. मा अवर सचिव, महाराष्ट्र शासन क्रमांक सीईटी २०१५/(प्र.क्र.१४९)/ टीएनटी-१ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई-३२, दि. ३० मे २०१८

५.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय सीईटी २०१५/प्र.क्र./१४९/टीएनटी-१/मंत्रालय दि. ०७/०२/२०१९.

६. पवित्र प्रणालीवर शिक्षक भरती करिता प्रसिध्द करण्यात आलेली जाहीरात. दि.०५/०१/२०२४

७. पवित्र प्रणालीद्वारे दि. २५/०२/२०२४ रोजी प्रसिद्ध झालेली पात्र उमेदवारांची यादी

८. मा. शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य) महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील क्र. पवित्र/पदभरती/कागदपत्रे पडताळणी /३०६/५३०९, दि.०९/०८/२०१९ चे पत्र

१०. दि. ०७/०३/२०२४ रोजीचा कागदपत्रे पडताळणी अहवाल

११. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई क्र.न्या.या.प्र.- २०१९/प्र.क्र.२६१/ टीएनटी-२दि.०४/०९/२०१९ चे पत्र

१२. मा. शिक्षण संचालक (प्राथ) महाराष्ट्र राज्य पुणे १ यांचेकडील क्र. प्राशिस २०१९/पवित्र प्रणाली/५०२/३१०४/१९ दि. ०४/०९/२०१९ चे पत्र.

१३. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८ /प्र.क्र.३९७/टिएनटि-१ दि. १२ जून २०१९

१४ महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८ /प्र.क्र.३९७/टिएनटि-१ दि.२५/०२/२०१९

१५. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क.संकीर्ण-२०२० /प्र.क्र.२६०/टिएनटि-१ दि. २१/०२/२०२३

१६. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१७४/टिएनटि-१ दि.२१/०६/२०२३

१७. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.५०९/टिएनटि-१ दि. १३/१०/ २०२३

१८. मा आयुका (शिक्षण) महारारा‌ष्ट्र राज्य पूर्ण-१ यांचेकडील जा.आस्था-प्र.क्र.१०६ पदभरती/२०२४/१८.२८/०१/२०२४

१९. मा आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे कडील आस्था-क्र.प्राथ. १०६/पदभरती २०२४/१४०८ दि.२५/०२/२०२४

२०. या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दि. ०४/०३/२०२४

---

जा. क्र. : नशिमं/२०२३-२४/७०२
नगरपरिषद शिक्षण मंडळ, जुन्नर
दिनांक: ०६/०३/२०२४

नियुक्ती आदेश

उपरोक्त संदर्भ क्रमांक ७ नुसार पवित्र प्रणाली अंतर्गत प्राप्त झालेल्या पात्र उमेदवारांच्या यादीनुसार व संदर्भिय पत्रान्वये शासनाने दिलेल्या आदेशानुसार खालील तक्त्यात नमूद उमेदवारास त्याच्या नावासमोरील स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या निवडीच्या प्रवर्गात व स्तंभ क्र. ६ मधील शाळेमध्ये खालील अटी व शर्तीच्या आधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

माध्यम मराठी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा मुळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | समांतर आरक्षणासाठी करण्यात आलेली शिफारस | नियुक्तीची न. प. जुन्नर प्राथ. शाळा क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम. कल्याणी सुरेश जावरे | इ.मा.व | इ.मा.व | लागू नाही | पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर प्राथ. विद्यालय |
| २ | श्री. प्रदीप ज्ञानोबा शिंदे | अ.जा. | अ.जा. | लागू नाही | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथ. विद्यालय |

खालील अटी व शती

१. शिक्षण सेवक पदावरील तुमची नियुक्ती मराठी माध्यमातून झालेली असून तिचा कालावधी तुम्ही हजर आलेल्या तारखेपासून ३ (तीन) वर्षा पर्यंत राहील तसेच शिक्षण सेवक म्हणून आपणास नगरपरिषद शिक्षण मंडळ, जुन्नर यांच्या कोणत्याही प्राथमिक शाळेत काम करावे लागेल.

२. नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरूपाची गैरवर्तणूक केल्यास आपली नियुक्ती रदद करणेत येईल, त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही. तथापी आपली नियुक्ती रद्द करण्याविरूध्द आपणास प्राधिकृत समितीकडे अपिल करता येईन.

३ नियमीत स्वरूपात नियुक्त केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या किंवा शासकीय करावयाच्या सेवाविषयक लाभ आपणास देय असणार नाहीत.

४. शिक्षण सेवक पदावर तीन वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर आपणास प्राथमिक शिक्षकांच्या नियमीत पदावर नियमीत वेतन श्रेणीत नियुक्ती देण्यास पात्र समजणेत येईल. आपण शिक्षण सेवक म्हणून केलेली सेवा निवृत्तीवेतन व सेवानिवृत्तीनंतरचे देय फायदे यासाठी शासन नियमांच्या अधिन राहून ग्राहय धरली जाईल.

५. आपणास नियुक्ती पत्र दिल्याच्या दिनांका पासून ०७ दिवसात नियुक्तीच्या जागी रूजू होणे आवश्यक राहील कोणत्याही परिस्थितीत ही मुदत वाढवून दिली जाणार नाही. आपण रूजू झाल्यानंतर अन्यजिल्हयातील नियुक्तीसाठी आपला विचार करण्यात येणार नाही.

६. आपणास शिक्षण सेवक म्हणून दरमहा रु.१६०००/- (रु .सोळा हजार) मानधन दिले जाईल.

७. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम (लागू असलेले सर्व ) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम- २००९ मधील नियम यथास्थिती आपणास लागू राहतील.

८. नियुक्तीच्या कालावधीत खालील कर्तव्ये पार पाडावी लागतील -

अ. संबधित न. प. चे शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करून घेण्याच्या तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविण्याच्या दृष्टीने पालकांशी संपर्क करणे.

आ. शाळेमध्ये दररोज संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेत उपस्थित रहाणे.

इ. अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यकते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे.

ई. नेमून दिलेल्या वर्गांचे विहीत कार्यपध्दती नुसार अध्यापन करणे.

उ. शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित रहाणे.

ऊ. शालेय मुख्याध्यापक व प्रशासन अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक बाबीबाबत त्यांच्या आदेशाचे पालन करणे.

ए. वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपुर्ण व सर्वकष मूल्यमापन करणे.

ऐ. शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या आयोजनामध्ये सहभागी होणे.

ओ. ही नियुक्ती आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आणि लागू असलेल्या जाती प्रमाणपत्र पडताळणीच्या आधीन राहील. प्रमाणपत्र पडताळणीत आपणास नियुक्ती दिलेल्या प्रवर्गा अंतर्गत नसलेचे सिध्द झालेस आपली सेवा समाप्त होईल.

औ. मुख्यालयी राहणे आपणावर बंधनकारक राहील.

९. मा. आयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचे दि.०५/०१/२००९ चे पत्रानुसार ऑक्टोबर २००७ मध्ये घेण्यात आलेल्या डी. एड. परीक्षेत समाविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना आंतर्वासिता अनिवार्य करणेत आली असून त्यांनी दि. ३१/०७/२००८ अखेर आंतर्वासिता समाधानकारकरित्या पूर्ण केले बाबत प्रमाणपत्र कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक राहील, अन्यथा तसे न झालेस नियुक्ती रद्द करणेत येईल.

१०. रुजू दिनांकापासून एका महिन्यामध्ये त्यांचे स्वतःच्या गावी व सध्या रहात असलेल्या गावातील घरी शौचालय असल्याचा दाखला कार्यालयाकडे सादर करावा.

११. समांतर आरक्षणाकरीता उमेदवाराने सादर केलेले दाखले अवैध ठरल्यास देण्यात आलेली नियुक्ती कोणतेही कारण न देता रद्द होईल.

१२. उमेदवाराने नियुक्ती दिलेल्या ठिकाणीच हजर होणे बंधन कारक आहे. नियुक्तीचे ठिकाण बदलून मागणेसाठी हस्ते परहस्ते दबाव आणल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१३. तांत्रिक किंवा अन्य कारणामुळे नियुक्ती आदेशात चूक झाली असल्यास आदेश रद्द वा दुरूस्त करण्याचा अधिकार प्रशासन अधिकारी यांना राहील.

१४. शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०२३/प्र.क्र.१७४/टीएनटी-१ दि.२१/०६/२०२३ नुसार आपणास जिल्हा बदलीचा हक्क राहणार नाही.

१५. नोकरीवर हजर झालेनंतर एक महिन्याच्या आत शारिरीकदृष्ट्या नोकरी करणेस पात्र असलेबाबतचा शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

१६. नोकरीवर हजर झालेनंतर एक महिन्याच्या आत पोलिस विभागाकडील चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१७. नियुक्ती मिळाल्यापासून जात वैधता प्रमाणपत्र तीन महिन्याच्या आत सादर करावयाचे आहे. विहीत मुदतीत सादर न केल्यास आपली नियुक्ती आपोआप रद्द होईल.

१८. सदर नियुक्ती पत्र हे न्यायालयात प्रलंबित असलेल्या पवित्र प्रणाली अंतर्गत करण्यात येणाऱ्या शिक्षक भरतीच्या संबंधातील याचिकांच्या निकालाच्या आधीन राहील, न्यायालयाने पवित्र प्रणाली अंतर्गत करण्यात येणाऱ्या शिक्षक भरतीच्या विरोधात निकाल दिल्यास सदर नियुक्ती पत्र रद्द करण्यात येईल.

१९. नियुक्ती पत्र देण्यात आलेल्या उमेदवाराकरिता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश बंधनकारक राहतील तसेच सदर नियुक्ती पत्र हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाच्या आधीन राहील.

२०. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केले जाणारे आदेश व सेवाशर्ती विषयी चे नियम आपणांस अनिवार्य राहतील.

(एस. डी. रोडगे)
प्रशासन अधिकारी
तथा
सदस्य सचिव
पवित्र शिक्षक भरती

प्रत माहितीसाठी सविनय सादर :

१. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे
२. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
३. मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद पुणे
४. मा. मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद